Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 5.98
Online Available at www.cmrj.in
ISSN No. 2456-1665

# उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांमधील संघर्ष व्यवस्थापन शैलीं आणि अध्यात्मिक बुद्धिमत्ता यातील सहसंबंधाचा अभ्यास

**डॉ. गजानन मुरलीधर खेकाडे**
**सहाय्यक प्राध्यापक**
**आर. सी. पटेल शिक्षणशास्त्र महाविद्यालय, शिरपूर**

***सारांश -***

*प्रस्तुत संशोधनात उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांमधील संघर्ष व्यवस्थापन शैली आणि अध्यात्मिक बुद्धिमत्ता यांतील सहसंबंधाचा अभ्यास करण्यासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीतील सर्वेक्षण पद्धतीचा अवलंब करण्यात आला. शिरपूर तालुक्यातील इयत्ता अकरावीमध्ये कला, विज्ञान व वाणिज्य शाखेत अध्ययन करणारे सर्व विद्यार्थी ही संशोधनाची जनसंख्या निश्चित केली आहे. सहेतुक नमुना निवड पद्धतीने एकूण 90 विद्यार्थ्यांची (प्रत्येकी 30) नमुना म्हणून निवड करण्यात आली. माहिती संकलनासाठी संशोधकाने स्वनिर्मित संघर्ष व्यवस्थापन शैली मापिका व अध्यात्मिक बुद्धिमत्ता मापिकेचा वापर केला आहे. प्रत्येकी 30 विधाने होती. संकलित माहितीच्या विश्लेषणासाठी मध्यमान, प्रमाणविचलन व 't' मूल्य या संख्याशास्त्रीय परिमाणांचा वापर करण्यात आला. अभ्यासातून शाखा व लिंगानुसार विद्यार्थ्यांमध्ये संघर्ष व्यवस्थापन शैली व अध्यात्मिक बुद्धिमत्ता यांचा सकारात्मक सहसंबंध आढळून येतो.*

**Key words:** *उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थी, संघर्ष व्यवस्थापन शैली आणि अध्यात्मिक बुद्धिमत्ता*

## प्रस्तावना

मानवी जीवनात संघर्ष हा अपरिहार्य असतो आणि तो व्यक्तिमत्त्व घडविण्याचा एक महत्त्वाचा घटक देखील आहे. कुटुंब, शाळा, समाज किंवा कार्यक्षेत्र जीवनाच्या प्रत्येक स्तरावर व्यक्तीला विविध प्रकारच्या संघर्षांना सामोरे जावे लागते. या संघर्षांना समजून घेऊन त्यांचे योग्य नियोजन व निराकरण करण्याची क्षमता म्हणजेच 'संघर्ष व्यवस्थापन शैली' अध्यात्मिक होय. व्यक्ती संघर्षाला कशी प्रतिक्रिया देते, निर्णय कसा घेते, संवाद कसा साधते आणि बदलत्या परिस्थितींशी कशी जुळवून घेते, यावर तिच्या वैयक्तिक तसेच सामाजिक आयुष्याचा दर्जा मोठ्या प्रमाणात अवलंबून असतो. याच संदर्भात अध्यात्मिक बुद्धिमत्ता ही संकल्पना अत्यंत महत्त्वाची ठरते. ती केवळ बौद्धिक क्षमतेपुरती मर्यादित नसून आत्मजाणीव, मूल्यबोध, सामाजिक

संवेदनशीलता, प्रभावी संवादकौशल्य, समस्या सोडविण्याची क्षमता आणि योग्य निर्णयक्षमता यांचा समन्वय साधते. अध्यात्मिक बुद्धिमत्ता असलेली व्यक्ती स्वतःच्या भावनिक स्थितीला ओळखू शकते, इतरांच्या भावनांना समजून घेते आणि तणावपूर्ण परिस्थितीतही शांत राहून विचारपूर्वक निर्णय घेऊ शकते. त्यामुळे ती व्यक्तीच्या वैयक्तिक विकासासोबतच सामाजिक संवाद, सहकार्य आणि जीवनातील संघर्ष निवारणातही मोलाची भूमिका बजावते. विशेषतः उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थी हा शैक्षणिक, भावनिक आणि सामाजिक बदलांचा संवेदनशील टप्पा अनुभवत असतो. कला, विज्ञान आणि वाणिज्य शाखांतील विद्यार्थ्यांना अभ्यासाचा वाढता ताण, स्पर्धेची तीव्रता, करिअर निवडीचे दडपण आणि सहाध्यायी संबंध यांसारख्या अनेक कारणांमुळे विविध संघर्षांना सामोरे जावे लागते. या संघर्षांचे प्रभावी व्यवस्थापन करण्याची त्यांची पद्धत त्यांच्या अध्यात्मिक बुद्धिमत्तेशी निगडित असते. म्हणूनच, शिरपूर तालुक्यातील उच्च माध्यमिक शाळांमधील कला, विज्ञान आणि वाणिज्य शाखांतील विद्यार्थ्यांच्या संघर्ष व्यवस्थापन शैली आणि त्यांच्या अध्यात्मिक बुद्धिमत्तेमधील सहसंबंधाचा अभ्यास करणे शैक्षणिक तसेच मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून अत्यंत उपयुक्त आणि आवश्यक ठरते. प्रस्तुत संशोधन विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक विकासाला चालना देण्याबरोबरच शैक्षणिक मार्गदर्शन, समुपदेशन आणि जीवनकौशल्यांच्या विकासासाठीही मोलाचे योगदान देईल.

**समस्या विधान**

शिरपूर शहरातील उच्च माध्यमिक शाळेतील कला, विज्ञान व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यामधील संघर्ष व्यवस्थापन शैलीं आणि अध्यात्मिक बुद्धिमत्ता यातील सहसंबंधाचा अभ्यास करणे.

**उद्दिष्टे**

१. उच्च माध्यमिक शाळेतील कला विद्यार्थ्यांमधील संघर्ष व्यवस्थापन शैलीं आणि अध्यात्मिक बुद्धिमत्ता यातील सहसंबंधाचा अभ्यास करणे.
२. उच्च माध्यमिक शाळेतील विज्ञान विद्यार्थ्यांमधील संघर्ष व्यवस्थापन शैलीं आणि अध्यात्मिक बुद्धिमत्ता यातील सहसंबंधाचा अभ्यास करणे.
३. उच्च माध्यमिक शाळेतील वाणिज्य विद्यार्थ्यांमधील संघर्ष व्यवस्थापन शैलीं आणि अध्यात्मिक बुद्धिमत्ता यातील सहसंबंधाचा अभ्यास करणे.
४. उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांमधील संघर्ष व्यवस्थापन शैलीं आणि अध्यात्मिक बुद्धिमत्ता यातील सहसंबंधाचा अभ्यास करणे.
५. उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थीनीमधील संघर्ष व्यवस्थापन शैलीं आणि अध्यात्मिक बुद्धिमत्ता यातील सहसंबंधाचा अभ्यास करणे.

**परिकल्पना**

१. उच्च माध्यमिक शाळेतील कला शाखेतील विद्यार्थ्यांमधील संघर्ष व्यवस्थापन शैलीं आणि अध्यात्मिक बुद्धिमत्ता यात सार्थ सहसंबध आढळून येत नाही.

२. उच्च माध्यमिक शाळेतील विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांमधील संघर्ष व्यवस्थापन शैलीं आणि अध्यात्मिक बुद्धिमत्ता यात सार्थ सहसंबध आढळून येत नाही.

३. उच्च माध्यमिक शाळेतील वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांमधील संघर्ष व्यवस्थापन शैलीं आणि अध्यात्मिक बुद्धिमत्ता यात सार्थ सहसंबध आढळून येत नाही.

४. उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांमधील संघर्ष व्यवस्थापन शैलीं आणि अध्यात्मिक बुद्धिमत्ता यात सार्थ सहसंबध आढळून येत नाही.

५. उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थीनीमधील संघर्ष व्यवस्थापन शैलीं आणि अध्यात्मिक बुद्धिमत्ता यात सार्थ सहसंबध आढळून येत नाही.

**संशोधनाची कार्यपद्धती**

- **संशोधन पद्धती-** उच्चमाध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांमधील संघर्ष व्यवस्थापन शैलींचा आणि अध्यात्मिक बुद्धिमत्ता यातील सह्संबंधाचा अभ्यास करण्यासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीतील सर्वेक्षण-सहसंबंध पद्धतीचा अवलंब केला आहे.
- **जनसंख्या-** प्रस्तुत संशोधनात, शिरपूर शहारातील उच्चमाध्यमिक शाळेतील इयत्ता अकरावीच्या वर्गात अध्ययन (कला, विज्ञान आणि वाणिज्य) करणारे सर्व मुली आणि मुले यांची संशोधनाची जनसंख्या म्हणून निश्चिती करण्यात आली आहे.
- **न्यादर्श-** सहेतुक नमुना निवड पद्धतीने माध्यमिक शाळेतील इयत्ता अकरावीच्या वर्गातील एकूण ९० विद्यार्थ्यांची नमुना म्हणून निवड करण्यात आली होती. ते खालीलप्रमाणे

| अ. नं. | कला शाखा | विज्ञान शाखा | वाणिज्य शाखा | एकूण |
|---|---|---|---|---|
| ०१ | ३० | ३० | ३० | ९० |

- **संशोधन साधने-** प्रस्तुत संशोधनात संशोधकाने खालील स्वनिर्मित प्रश्नावालींचा अवलंब माहिती संकलनासाठी करण्यात आला आहे.

१. **संघर्ष व्यवस्थापन शैलीं-** प्रस्तुत संशोधनात, उच्चमाध्यमिक शाळेतील इयत्ता अकरावीच्या वर्गात अध्ययन (कला, विज्ञान आणि वाणिज्य) करणाऱ्या विद्यार्थ्यांचे संघर्ष व्यवस्थापन शैलींचे मापन करण्यासाठी संशोधकाची स्वनिर्मित संघर्ष व्यवस्थापन शैलीं मापिकेचा अवलंब केला आहे. त्यात एकूण 30 विधाने होती. ही विधाने संघर्षाची दृष्टीकोण, प्रभावशीलता आणि निर्णयक्षमता, संघर्षाच्या प्रकारानुसार शैलीची निवड, व्यक्तिमत्व व मानसिकता व संघर्षावर प्रतिसाद या घटकावर आधारित आहेत. प्रतिसाद नोंदविण्यासाठी सहमत, असहमत व सांगता येत नाही हे पर्याय देण्यात आले.

२. **अध्यात्मिक बुद्धिमत्ता-** प्रस्तुत संशोधनात, उच्चमाध्यमिक शाळेतील इयत्ता अकरावीच्या वर्गात अध्ययन (कला, विज्ञान आणि वाणिज्य) करणाऱ्या विद्यार्थ्यांची अध्यात्मिक बुद्धिमत्तेचे मापन

करण्यासाठी संशोधकाची स्वनिर्मित अध्यात्मिक बुद्धिमत्ता मापिकेचा अवलंब केला आहे. त्यात एकूण 30 विधाने होती. ही विधाने आत्मजाणीव, मूल्यबोध, सामाजिक कौशल्ये आणि निर्णयक्षमता या घटकावर आधारित आहेत. प्रतिसाद नोंदविण्यासाठी सहमत, असहमत व सांगता येत नाही हे पर्याय देण्यात आले.

- **संख्याशास्त्रीय परिमाणे-** प्रस्तुत संशोधनातील संकलित माहितीचे विश्लेषण करण्यासाठी मध्यमान, प्रमाणविचलन व 't' मुल्य या संख्याशास्त्रीय परिमाणाचा अवलंब केला आहे.

**संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन**

प्रस्तुत संशोधनात उच्चमाध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांमधील संघर्ष व्यवस्थापन शैलींचा आणि अध्यात्मिक बुद्धिमत्ता यातील सह्संबंधाचा अभ्यास करण्यासाठी विद्यार्थ्यांना स्वनिर्मित शोधिका देण्यात आल्या होत्या. विद्यार्थ्यांनी दिलेल्या प्रतिसादाचे विश्लेषण करून पुढील प्रमाणे परिकल्पना परीक्षण करण्यात आले होते.

**परिकल्पना परीक्षण**

**१. उच्च माध्यमिक शाळेतील कला शाखेतील विद्यार्थ्यांमधील संघर्ष व्यवस्थापन शैलीं आणि अध्यात्मिक बुद्धिमत्ता यात सार्थ सहसंबध आढळून येत नाही.**

**तक्ता क्र. ०१**

| कला शाखा | नमुना | सारणी 'r' मूल्य | प्राप्त 'r' मूल्य | त्याग/स्वीकार |
|---|---|---|---|---|
| संघर्ष व्यवस्थापन शैलीं | ३० | .१९५ | .७७७ | त्याग |
| अध्यात्मिक बुद्धिमत्ता | | | | |

- **निरीक्षण व निष्कर्ष** - तक्ता क्रमांक- ०१ नुसार, प्राप्त 'r' मूल्य सारणी 'r' मूल्यापेक्षा मोठे आहे. प्राप्त 'r' मूल्य .७७७ आहे, जे सारणी 'r' मूल्य (०.०५ स्तरावर) ०.१९५ पेक्षा अधिक आहे. म्हणून शून्य परिकल्पनेचा (Null Hypothesis) त्याग करावा लागेल. याचा अर्थ, उच्च माध्यमिक शाळेतील कला शाखेतील विद्यार्थ्यांमधील संघर्ष व्यवस्थापन शैलीं आणि अध्यात्मिक बुद्धिमत्ता यात सार्थ सहसंबध आढळून येतो, तसेच यात धनात्मक सहसंबंध दिसून येतो. प्राप्त 'r' मूल्य .७७७ हे दर्शवते की संघर्ष व्यवस्थापन शैलीं आणि अध्यात्मिक बुद्धिमत्ता यांच्यात धनात्मक सहसंबंध (Significant Positive Correlation) आहे. ज्या विद्यार्थ्यांची संघर्ष व्यवस्थापन शैलीं सकारात्मक असते, त्यांची अध्यात्मिक बुद्धिमत्ता देखील जास्त असते.

**२. उच्च माध्यमिक शाळेतील विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांमधील संघर्ष व्यवस्थापन शैली आणि अध्यात्मिक बुद्धिमत्ता यात सार्थ सहसंबध आढळून येत नाही.**

**तक्ता क्र. ०२**

| विज्ञान शाखा | नमुना | सारणी 'r' मूल्य | प्राप्त 'r' मूल्य | त्याग/स्वीकार |
|---|---|---|---|---|
| संघर्ष व्यवस्थापन शैली<br>अध्यात्मिक बुद्धिमत्ता | ३० | .१९५ | .७८४ | त्याग |

- **निरीक्षण व निष्कर्ष** - तक्ता क्रमांक- ०२ नुसार, प्राप्त 'r' मूल्य सारणी 'r' मूल्यापेक्षा मोठे आहे. प्राप्त 'r' मूल्य .७८४ आहे, जे सारणी 'r' मूल्य (०.०५ स्तरावर) ०.१९५ पेक्षा अधिक आहे. म्हणून शून्य परिकल्पनेचा (Null Hypothesis) त्याग करावा लागेल. याचा अर्थ, उच्च माध्यमिक शाळेतील विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांमधील संघर्ष व्यवस्थापन शैली आणि अध्यात्मिक बुद्धिमत्ता यात सार्थ सहसंबध आढळून येतो, तसेच यात धनात्मक सहसंबंध दिसून येतो. प्राप्त 'r' मूल्य .७८४ हे दर्शवते की संघर्ष व्यवस्थापन शैली आणि अध्यात्मिक बुद्धिमत्ता यांच्यात धनात्मक सहसंबंध (Significant Positive Correlation) आहे. ज्या विद्यार्थ्यांची संघर्ष व्यवस्थापन शैली सकारात्मक असते, त्यांची अध्यात्मिक बुद्धिमत्ता देखील जास्त असते.

**३. उच्च माध्यमिक शाळेतील वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांमधील संघर्ष व्यवस्थापन शैली आणि अध्यात्मिक बुद्धिमत्ता यात सार्थ सहसंबध आढळून येत नाही.**

**तक्ता क्र. ०३**

| वाणिज्य शाखा | नमुना | सारणी 'r' मूल्य | प्राप्त 'r' मूल्य | त्याग/स्वीकार |
|---|---|---|---|---|
| संघर्ष व्यवस्थापन शैली<br>अध्यात्मिक बुद्धिमत्ता | ३० | .१९५ | .७४४ | त्याग |

- **निरीक्षण व निष्कर्ष** - तक्ता क्रमांक- ०३ नुसार, प्राप्त 'r' मूल्य सारणी 'r' मूल्यापेक्षा मोठे आहे. प्राप्त 'r' मूल्य .७४४ आहे, जे सारणी 'r' मूल्य (०.०५ स्तरावर) ०.१९५ पेक्षा अधिक आहे. म्हणून शून्य परिकल्पनेचा (Null Hypothesis) त्याग करावा लागेल. याचा अर्थ, उच्च माध्यमिक शाळेतील वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांमधील संघर्ष व्यवस्थापन शैली आणि अध्यात्मिक बुद्धिमत्ता यात सार्थ सहसंबध आढळून येतो, तसेच यात धनात्मक सहसंबंध दिसून येतो. प्राप्त 'r' मूल्य .७४४ हे दर्शवते की संघर्ष व्यवस्थापन शैली आणि अध्यात्मिक बुद्धिमत्ता यांच्यात धनात्मक सहसंबंध (Significant Positive Correlation) आहे. ज्या विद्यार्थ्यांची संघर्ष व्यवस्थापन शैली सकारात्मक असते, त्यांची अध्यात्मिक बुद्धिमत्ता देखील जास्त असते.

**४. उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांमधील संघर्ष व्यवस्थापन शैलीं आणि अध्यात्मिक बुद्धिमत्ता यात सार्थ सहसंबध आढळून येत नाही.**

**तक्ता क्र. ०४**

| उच्च माध्यमिक शाळा विद्यार्थी | नमुना | सारणी 'r' मूल्य | प्राप्त 'r' मूल्य | त्याग/स्वीकार |
|---|---|---|---|---|
| संघर्ष व्यवस्थापन शैलीं<br>अध्यात्मिक बुद्धिमत्ता | ४५ | .१९५ | .७८० | त्याग |

- **निरीक्षण व निष्कर्ष** - तक्ता क्रमांक- ०४ नुसार, प्राप्त 'r' मूल्य सारणी 'r' मूल्यापेक्षा मोठे आहे. प्राप्त 'r' मूल्य .७८० आहे, जे सारणी 'r' मूल्य (०.०५ स्तरावर) ०.१९५ पेक्षा अधिक आहे. म्हणून शून्य परिकल्पनेचा (Null Hypothesis) त्याग करावा लागेल. याचा अर्थ, उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांमधील संघर्ष व्यवस्थापन शैलीं आणि अध्यात्मिक बुद्धिमत्ता यात सार्थ सहसंबध आढळून येतो, तसेच यात धनात्मक सहसंबंध दिसून येतो. प्राप्त 'r' मूल्य .७८० हे दर्शवते की संघर्ष व्यवस्थापन शैलीं आणि अध्यात्मिक बुद्धिमत्ता यांच्यात धनात्मक सहसंबंध (Significant Positive Correlation) आहे. ज्या विद्यार्थ्यांची संघर्ष व्यवस्थापन शैलीं सकारात्मक असते, त्यांची अध्यात्मिक बुद्धिमत्ता देखील जास्त असते.

**५. उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थीनीमधील संघर्ष व्यवस्थापन शैलीं आणि अध्यात्मिक बुद्धिमत्ता यात सार्थ सहसंबध आढळून येत नाही.**

**तक्ता क्र. ०४**

| उच्च माध्यमिक शाळा विद्यार्थीनी | नमुना | सारणी 'r' मूल्य | प्राप्त 'r' मूल्य | त्याग/स्वीकार |
|---|---|---|---|---|
| संघर्ष व्यवस्थापन शैलीं<br>अध्यात्मिक बुद्धिमत्ता | ४५ | .१९५ | .७१८ | त्याग |

- **निरीक्षण व निष्कर्ष** - तक्ता क्रमांक- ०४ नुसार, प्राप्त 'r' मूल्य सारणी 'r' मूल्यापेक्षा मोठे आहे. प्राप्त 'r' मूल्य .७१८ आहे, जे सारणी 'r' मूल्य (०.०५ स्तरावर) ०.१९५ पेक्षा अधिक आहे. म्हणून शून्य परिकल्पनेचा (Null Hypothesis) त्याग करावा लागेल. याचा अर्थ, उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थीनीमधील संघर्ष व्यवस्थापन शैलीं आणि अध्यात्मिक बुद्धिमत्ता यात सार्थ सहसंबध आढळून येतो, तसेच यात धनात्मक सहसंबंध दिसून येतो. प्राप्त 'r' मूल्य .७१८ हे दर्शवते की संघर्ष व्यवस्थापन शैलीं आणि अध्यात्मिक बुद्धिमत्ता यांच्यात धनात्मक सहसंबंध (Significant Positive Correlation) आहे. ज्या विद्यार्थीनीची संघर्ष व्यवस्थापन शैलीं सकारात्मक असते, त्यांची अध्यात्मिक बुद्धिमत्ता देखील जास्त असते.

## निष्कर्ष

१. उच्च माध्यमिक शाळेतील कला शाखेतील विद्यार्थ्यांमधील संघर्ष व्यवस्थापन शैलीं आणि अध्यात्मिक बुद्धिमत्ता यात सार्थ सहसंबध आढळून येतो.
२. उच्च माध्यमिक शाळेतील विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांमधील संघर्ष व्यवस्थापन शैलीं आणि अध्यात्मिक बुद्धिमत्ता यात सार्थ सहसंबध आढळून येतो.
३. उच्च माध्यमिक शाळेतील वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांमधील संघर्ष व्यवस्थापन शैलीं आणि अध्यात्मिक बुद्धिमत्ता यात सार्थ सहसंबध आढळून येतो.
४. उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांमधील संघर्ष व्यवस्थापन शैलीं आणि अध्यात्मिक बुद्धिमत्ता यात सार्थ सहसंबध आढळून येतो.
५. उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थीनीमधील संघर्ष व्यवस्थापन शैलीं आणि अध्यात्मिक बुद्धिमत्ता यात सार्थ सहसंबध आढळून येतो.

## निष्कर्षाच्या आधारावर चर्चा

या अभ्यासातून स्पष्ट होते की कला, विज्ञान आणि वाणिज्य शाखांतील तसेच एकत्रित विद्यार्थ्यांमध्ये संघर्ष व्यवस्थापन शैली आणि अध्यात्मिक बुद्धिमत्तेत सकारात्मक सहसंबंध दिसून येतो. याचा अर्थ असा की वैयक्तिक फरक, शाखा आणि लिंग यासारखे घटक विद्यार्थ्यांच्या कौशल्यांवर परिणाम करतात. यावरून हे स्पष्ट होते की विद्यार्थ्यांमध्ये संघर्ष व्यवस्थापन आणि अध्यात्मिक बुद्धिमत्तेचा विकास करणे गरजेचे आहे. यासाठी शाळा, शिक्षक आणि पालकांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे गरजेचे आहे. शाळा जीवनकौशल्य आणि मूल्यशिक्षणावर आधारित कार्यक्रम राबवून विद्यार्थ्यांना नैतिक व सामाजिक दृष्ट्या सक्षम बनवू शकतात. शिक्षकांनी अभ्यासात चर्चा, समूहकार्य, समस्या सोडविण्याचे अनुभव आणि निर्णयक्षमता वाढविणाऱ्या क्रियाकलापांना प्रोत्साहन द्यावे. पालकांनी घरात संवाद, सहकार्य, सकारात्मक वर्तन आणि आत्मविश्वास वाढविणारे वातावरण तयार करावे. तसेच विद्यार्थ्यांना संयम, सहनशक्ती आणि विवेकी निर्णय घेण्याचे मार्गदर्शन सतत केले पाहिजे.

## संदर्भग्रंथ सूची

Best & Kahn. (2006). *Research in Education (9th Ed)*. Delhi: Prentice Hall of India.

Garrett, H .E. (2006). *Statistics in Psychology & Education* (1st Ed. Indian Reprint). Delhi: Sage Publication.

Kumar, Ranjit. (2011). *Research Methodology a step by step guide for beginners* (3rd Ed). New Delhi: Sage Publication.

Raja Kumar, P.G. (2013). *Research Methodology (1st Ed.)*. Delhi: APH Publishing Corporation.

Saeed, T., Almas, S., Anis-ul-Haq, M., & Niazi, G. S. K. (2014). Leadership styles: relationship with conflict management styles. *International journal of conflict management*, 25(3), 214-225.

P. Greeff, Tanya De Bruyne, A. (2000). Conflict management style and marital satisfaction. *Journal of sex & marital therapy*, 26(4), 321-334.

Morris, M. W., Williams, K. Y., Leung, K., Larrick, R., Mendoza, M. T., Bhatnagar, D., & Hu, J. C. (1998). Conflict management style: Accounting for cross-national differences. *Journal of international business studies*, 29(4), 729-747.

आगलावे, प्रदीप. (२०००). *संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे,* नागपूर: विद्या प्रकाशन.

घोरमोडे, के. यु., घोरमोडे, कला, (२००८). *शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे*, नागपूर: विद्या प्रकाशन.

भितांडे, वि. रा. (२००७). *शैक्षणिक संशोधन पद्धती.* (प्रथम आवृत्ती). पुणे: नित्यनूतन प्रकाशन.

मुळे व उमाठे. (१९९८). *शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे.* (तिसरी आवृत्ती). नागपूर: विद्या बुक्स प्रकाशन.